



# महाराष्ट्र न्युज
अपडेट प्रत्येक क्षेत्रातील

प्रत्येक क्षेत्रातील बातम्यांच्या अपडेटसाठी जॉईन व्हा आमच्या व्हॉट्सॲप ग्रुपला

maharahstranews.com
maharahstranews.com@gmail.com

नाशिक
डिजिटल वेब-पोर्ट आवृत्ती

अंक नं.२२४
UdyamMH230047906

रविवार, दि.१ सप्टेंबर २०२४

YouTube


## लाडकी बहीण योजना कुणी माईचा लाल बंद पाडू शकणार नाही: ना. पवार



**नागपूर :** आम्ही वचन पाळणारी लोक आहोत आणि वचनपूर्ती करणारे हे सरकार आहे. आम्ही दिशाभूल करणारे सरकार नाही. आम्ही लाडकी बहीण योजनेच्या निमित्याने अडीच कोटी महिलांना या योजनेचे उद्दिष्ट डोळ्यासमोर ठेवलं आहे. आता या योजनेत जवळ जवळ १ कोटी ६० लाख बहिणी लाभार्थी झाल्या आहेत. अजून पुढचे टप्पेही लवकरच होणार आहे. ज्यांच्या अर्ज राहिल्या आहे, त्यांनी अजून ही अर्ज करावे. आम्ही तो लाभ त्यांना देऊ. मात्र विरोधक या महत्वाकांशी योजनेचे टिंगल टवाळी करत होते. योजनेवर शंका व्यक्त करत होते. हे विरोधक एवढे वर्ष सत्तेत होते, तेव्हा तुम्हाला का नाही सुचले महिलांना मदत करण्याचे? तोंडात सोन्याचा चमचा घेऊन जन्माला आलेले काही विरोधक आमच्यावर टीका करत आहेत. मात्र तुम्ही फक्त महायुतील साथ द्या, लाडकी बहीण योजना कुणी माईचा लाल बंद पाडू शकणार नाही, असा विश्वास राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी बोलताना व्यक्त केला आहे.

नागपूरच्या रेशिमबाग मैदानावर राज्य सरकारच्या महत्वाकांक्षी लाडकी बहिण योजनेच्या दुसऱ्या टप्प्याचे कार्यक्रम संपन्न होत आहे. या कार्यक्रमाला राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार, केंद्रीय मंत्री नितीन गडकरी आणि इतर महायुतीतील प्रमुख नेत्यांच्या उपस्थित हा कार्यक्रम झाला. या कार्यक्रमात महिला आणि बालकल्याण मंत्री अदिती तटकरे यादेखील उपस्थित आहे.

# नाशिकला गणेशोत्सवात डीजे वाजणार...

## दिवसा ५५ तर, रात्री ४५ डेसिबलपेक्षा कमी आवाज ठेवण्याच्या सूचना

**नाशिक (प्रतिनिधी):** पालकमंत्री दादा भुसे यांनी ध्वनी मर्यादापाळून डीजे वाजवण्यास हरकत स्पष्ट केले. तर न्यायालयाच्या आदेशानुसार ध्वनीमर्यादेचे उल्लंघन केल्यास मंडळांवर गुन्हा दाखल करण्याचा इशारा त्याचवेळी पोलिसांनीही दिला आहे. दुसरीकडे उत्सव साजरे करण्याला विरोध नाही मात्र उत्साहाच्या भरात ध्वनीमर्यादेचे पालन होत नाही. किंबहुना ध्वनीमर्यादा ओलांडली असल्याची यंत्रणा ठिकठिकाणी लावलेली आहे का? ध्वनीमर्यादा मोजणार कशी आणि उल्लंघन झाल्यास कारवाई काय करणार की कारवाई कागदावरच राहणार असे सवाल पर्यावरण प्रेमींनी उपस्थित केले आहेत.

सार्वजनिक गणेशोत्सव २०२४ शांतता समितीची बैठक शुक्रवारी (दि.३०) जिल्हा नियोजनच्या सभागृहात पार पडली. यावेळी पालकमंत्री भुसे यांनी शासन नियमाप्रमाणे आवाजाच्या मर्यादेत डीजे वाजविण्यास हरकत नसल्याचे गणेशमंडळांना सांगितेल. विसर्जन मार्गावरील खड्डे बुजविणे, अतिक्रमण काढणे, विद्युत तारा हटविणे, याबाबतही सूचना देण्यात आल्या. यावेळी आमदार सीमा हिरे, पोलीस आयुक्त संदीप कर्णिक, जिल्हाधिकारी जलज शर्मा, निवासी उपजिल्हाधिकारी राजेंद्र वाघ आदिंसह विविध विभागांचे अधिकारी, सार्वजनिक गणेशोत्सव मंडळाचे पदाधिकारी, विविध गणेश मंडळांचे अध्यक्ष, कार्यकर्ते उपस्थित होते. दरम्यान गणेशोत्सवाच्या विविध मुद्यांबाबत पालकमंत्र्यांशी दोन दिवसांत पुन्हा चर्चा करणार असल्याचे गणेशोत्सव महामंडळाचे अध्यक्ष समीर शेटे यांनी सांगितले.



### डेसिबल मर्यादेचे उल्लंघन झाल्यास गुन्हा!

*ध्वनी प्रदुषण टाळण्याकरीता ध्वनी क्षेपकाच्या वापराबाबात सर्वोच्च न्यायालयाचे निर्देशानुसार नियम व कायद्याचे काटेकोरपणे पालन पोलिस प्रशासनाकडून केले जाते. डीजे लावण्यास पोलिसांकडून परवानी दिली जात नाही. डीसेबल आदेशाचे उल्लंघन झाल्यास पोलिसांकडून कारवाई केली जाते. औद्योगीक क्षेत्रात दिवसा ७५ रात्री ७०, वाणिज्य क्षेत्र दिवसा ६५ रात्री ५५ आणि निवासी क्षेत्र दिवसा ५५ आणि रात्री ४५ शांतता क्षेत्र दिवसा ५० आणि रात्री ४० या डिसेबल प्रमाणे ध्वनीक्षेपक वाजवण्यास परवानी असते या आदेशाचे उल्लंघन झाल्यास कारवाई केली जाईल अशी माहिती उपआयुक्त किरणकुमार चव्हाण यांनी दिली.*

### ...या दुष्परिणामांची भीती

दिवसभरात ५५ डेसिबल, तर रात्री १० वाजेनंतर ४५ डेसिबल आवाजाचा नियम आहे. यापेक्षा अधिक आवाज अधिक वेळ कानी पडल्यास लहान मुलांना कानाचे विकार जडू शकतात. मोठ्यांनाही ही भीती असते. जास्त आवाजामुळे मन विचलित होते, चिडचीड वाढते. डोकेदुखीचा त्रास वाढतो. दमा, हृदयविकाराच्या रुग्णांचा अधिक त्रास. गरोदर महिलांच्या बाळावर विपरित परिणाम. अधिक काळ कमाल मर्यादेपेक्षा वरचा आवाज राहिल्यास हृदयविकाराचीही शक्यता वाढते. पक्षी, प्राणीही घाबरतात. ते चिडचिडे होऊन माणसाला त्रास देण्याचे प्रकारही घडण्याची भीती वाढते.

> पालकमंत्र्यांनी गणेशोत्सवात डीजेला परवानगी दिली, ही अतिशय आनंदाची गोष्ट आहे. फक्त आवाज मर्यादेचे पालन व्हायला हवे. पोलिसांकडेही डेसिबल मीटर आहे का? असतील तर पुरेसे आहेत का, याचाही विचार होणे गरजेचे आहे. नसतील तर प्रशासनाने ही तरतूदही गणेशोत्सवापूर्वी करणे आवश्यक आहे. किंवा गणेश मंडळांनीच पुढाकार घेत स्वखर्चातून हे मीटर घेऊन आवाज मर्यादेवर लक्ष ठेवल्यास नागरिकांना त्रास होणार नाही आणि उत्सवही आनंदात साजरा होईल. या यंत्राची किंमत अगदी २ हजारपासून कमी आहे. त्यामुळे याचा विचार होणे गरजेचे आहे.
>
> – **प्रा. किरणकुमार जोहरे,** भौतिकशास्त्रज्ञ, विज्ञान-तंत्रज्ञान अभ्यासक

डीजेवर अलीकडे अत्यंत विचित्र, आक्षेपार्ह गाणी वाजवली जात आहेत. आपल्या संस्कृतीची जाणीव ठेवून मराठमोळी गाणीच डीजेवर वाजवण्याबाबतही पालकमंत्र्यांनी बंधने घालावीत आणि आक्षेपार्ह, महिलांना लज्जा निर्माण होईल, अशा गीतांना बंदी घालावी, अशी मागणीही सुजाण नागरिकांकडून केली जात आहे. मुख्य म्हणजे, गणेश मंडळ पदाधिकाऱ्यांनीच सामाजिक भान ठेवून मर्यादा पालन करावे, अशीही मागणी नागरिकांकडून केली जात आहे.

### भावडबारी घाट रस्ता झाला बिकट

# काम रखडल्याने रस्त्यावर वाहने चालवणे अवघडच!


**जगदिश निकम,**
**देवळा (प्रतिनिधी):** विंचूर-प्रकाशा या महामार्गाची देवळा ते भावडबारी घाट दरम्यान बिकट अवस्था झाली असून या मार्गाचे काम गेल्या सहा महिन्यांपासून रखडल्याने रस्त्यावर वाहने चालवणे अवघड झाले आहे. वाहनधारकांना वाहने चालवणे जिकिरीचे झाले आहे. तर प्रवाशांना जीव मुठीत धरून प्रवास करावा लागत आहे. पावसाच्या दिवसांत येथे अपघात होऊन शारीरिक इजा तसेच वाहनांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले.

प्रवाशांच्या जिवांशी चालू असलेला खेळ अजून किती दिवस सुरू राहणार..! असा प्रश्न उपस्थित केला जात आहे. त्यामुळे आता आंदोलनाची भाषा सुरू झाली आहे. भावडबारी घाट ते रामेश्वरफाटा या सात किमी रस्त्यांचे काम गेल्या सहा महिन्यांपासून शेतकऱ्यांच्या जमीन अधिग्रहण व मोबदला मिळेल की नाही याबाबतचा तिढा न सुटल्याने सदरचे सात किमी रस्त्याचे काम दुसऱ्या बाजूचे अवघ्या सहा मीटर रूंदीचे कॉक्रीटीकरण झाले असून त्यावर शेकडो वाहनांची वाहतूक दररोज चालू आहे. तर उर्वरित रस्त्याची भीषण दुरवस्था झाली आहे.

मधल्या काळात अनेक आंदोलने होऊनही शेतकरी व महामार्ग प्रशासन यांच्यात तोडगा निघालाच नाही. यास पंधरा ते वीस दिवसांचा कालावधी लोटला असून यादरम्यान या रस्त्याची कामे जेथे रखडली आहेत तिथे पावसामुळे रस्त्यावर मोठमोठे खड्डे पडले आहेत. खड्ड्यातून जाताना अनेक वाहने नादुरुस्त होत असून अनेक एसटी बसेसला याचा फटका बसत आहे. रस्त्यात मोठमोठे खड्डेपडल्याने वाहनांच्या गतीला ब्रेक बसला आहे. अत्यंत संथ गतीने वाहतूक सुरू असते. देवळा ते भावडबारी घाटाच्या दक्षिण पायथ्यापर्यंत १५ किमी.ला जवळपास जेवढा वेळ लागतो तेवढ्या वेळात पुढील ६० किमी.चा प्रवास होऊन जातो. यावरून या रस्त्याची दुरवस्था लक्षात येते. या महामार्गावरील या दुरवस्थामय झालेल्या रस्त्याचे काम तातडीने हाती घ्यावे अन्यथा आंदोलन करण्याचा मार्ग शोधला जात आहे.

> *ह्या महामार्गावरील देवळा ते घाट दरम्यानच्या रस्त्याच्या दुरावस्थेमुळे प्रवास नकोसा वाटतो. दोन दिवसा पूर्वी येथील प्रवासात दोन अपघात आमच्यासमोर झाले. एकाच मार्गावर दुहेरी वाहतूक चालू असल्याने या प्रवासात धोका जास्त आहे तसेच जेथे काम झालेले नाही तेथे मोठमोठे खड्डे पडले असल्याने वाहतुकीला खोळंबा होतो, वाहनांचे नुकसान होत आहे. यावर तातडीने उपाययोजना होण्याची गरज आहे.*
>
> ***सतीश जाधव, सामाजिक कार्यकर्ते खालप ता.देवळा***

> *देवळ्याहून नाशिककडे जाताना सुरुवातीचा १५ किमीचा प्रवास जीवघेणा झाला आहे. महामार्ग प्रशासन व शेतकरी यांच्या वादात प्रवाशांची पिळवणूक केली जात आहे. आमचे मित्र निखिल आहेर यांच्यासह कितीतरी जणांचे अपघात झाल्याने अत्यंत धोकेदायक प्रवास सिद्ध होत आहे. याची जबाबदारी कोण घेणार याचे उत्तर मागण्याची वेळ आली आहे. पुढील पंधरा दिवसांत या कामाला सुरुवात न झाल्यास चालक व प्रवाशी यांच्या वतीने उस्फ्फ़ुर्त आंदोलन छेडण्यात येईल.*
>
> ***– पवन अहिरराव, चेअरमन श्रीबालाजी पतसंस्था देवळा***

# अपात्र ठरणाऱ्या शेतकऱ्यांना कर्जमाफी मिळणार नाही!

**नाशिक (प्रतिनिधी):** याव्यतिरिक्त, शिधापत्रिकाधारकांसाठी आणखी एक चांगली बातमी आहे. या ग्राहकांना आता सरकारच्या विविध योजनांचा लाभ मिळू लागणार आहे. शिधापत्रिका धारकांना या ७ सरकारी योजनांचा लाभ मिळणार आहे, ज्यामध्ये महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना, प्रधानमंत्री आवास योजना, प्रधानमंत्री जीवन ज्योती बीमा योजना, प्रधानमंत्री सुरक्षा बीमा योजना, अटल पेन्शन योजना, प्रधानमंत्री श्रम योगी मानधन योजना आणि राष्ट्रीय सामाजिक सहाय्य कार्यक्रम या महत्त्वाच्या योजना समाविष्ट आहेत.

या योजनांचा लाभ घेण्यासाठी शिधापत्रिकाधारकांना या ठिकाणी नोंदणी करणे आवश्यक आहे. ते सर्व ग्रामीण आणि शहरी भागातील शिधापत्रिकाधारक असू शकतात. याव्यतिरिक्त, शेतकऱ्यांसाठी देखील एक महत्त्वाची बातमी आली आहे. कृषी कर्जमाफी योजनेतून अपात्र ठरणाऱ्या शेतकऱ्यांची नवीन यादी जाहीर करण्यात आली आहे. या यादीत समाविष्ट असणाऱ्या शेतकऱ्यांना कर्जमाफीचा लाभ मिळणार नाही. यासर्व नव्या अद्ययावत माहितीचा आढावा घेतल्यानंतर, असे म्हणता येईल की, एलपीजी गॅस सिलेंडर ग्राहकांना आणि शिधापत्रिकाधारकांना अनेक नवीन लाभ मिळणार आहेत. परंतु, त्यासाठी ग्राहकांना आपल्या बाजूने जवळपास एक महिन्याच्या आत ही ई-केवायसी प्रक्रिया पूर्ण करणे गरजेचे आहे. अन्यथा, त्यांचे गॅस कनेक्शन कायमस्वरूपी बंद होऊ शकते. दरम्यान, शिधापत्रिकाधारक ग्राहकांसाठी सरकारच्या विविध योजनांचा लाभ मिळण्याची संधी आली आहे. त्यांना या ठिकाणी नोंदणी करणे अत्यंत महत्त्वाचे आहे. शेतकऱ्यांसाठी देखील कर्जमाफी योजनेतून अपात्र ठरणाऱ्यांची नवीन यादी जारी करण्यात आली आहे. या सर्व नव्या गोष्टींची माहिती घेऊन, एलपीजी गॅस सिलेंडर आणि शिधापत्रिका धारकांना आता आपल्या बाजूने कार्यवाही करण्याची वेळ आली आहे. जेणेकरून ते या योजनांचा लाभ घेऊ शकतील.

# ग्राहकांनी ई-केवायसी पुर्ण न केल्यास यापुढे सिलेंडर देण्यास नकार मिळणार




**नाशिक (प्रतिनिधी):** सर्व एलपीजी गॅस सिलेंडर ग्राहकांना आता ई-केवायसी (इलेक्ट्रॉनिक केवायसी) करणे आवश्यक ठरले आहे. जर ग्राहकांनी या मुदतीत ई-केवायसी केली नाही, तर त्यांचे गॅस कनेक्शन कायम स्वरूपी बंद केले जाऊ शकते. या ई-केवायसी प्रक्रियेमागील मुख्य कारण म्हणजे गॅस कंपन्यांचा प्रयत्न घरगुती आणि व्यावसायिक ग्राहकांना ओळखण्याचा. एलपीजी गॅस वितरण कंपनीने या उपक्रमाला पुन्हा एकदा गती दिली आहे. ज्या ग्राहकांनी आजपर्यंत ई-केवायसी केलेली नाही, त्यांनी लवकरात लवकर हे काम पूर्ण करणे गरजेचे आहे.

एलपीजी गॅस सिलेंडर ग्राहकांना आतापर्यंत या प्रक्रियेसाठी कोणत्याही प्रकारच्या कागदपत्रांची आवश्यकता भासत नव्हती. परंतु या नव्या नियमाद्वारे ग्राहकांना आता आधार कार्डाची आवश्यकता आहे. यासाठी ग्राहकांना जवळच्या गॅस कंपनीच्या केंद्रावर जावे लागेल किंवा ते ऑनलाईन पद्धतीनेही ही ई-केवायसी करू शकतात. आता अशी परिस्थिती असल्याने, ज्या ग्राहकांनी आजपर्यंत ही प्रक्रिया पूर्ण केलेली नाही, त्यांनी १ सप्टेंबर २०२३ पूर्वी ही ई-केवायसी प्रक्रिया पूर्ण केली पाहिजे. अन्यथा, त्यांचे एलपीजी गॅस कनेक्शन कायमस्वरूपी बंद केले जाऊ शकते. ग्राहकांसाठी हा नियम खूप महत्त्वाचा असून, गॅस कंपन्यांनीही याबाबत कठोर निर्णय घेतले आहेत. ज्या ग्राहकांनी ई-केवायसी न केल्यास, त्यांना पुढील आठवड्यात सिलेंडर देण्यास नकार दिला जाईल, असे या नियमातून स्पष्ट होत आहे.

## राष्ट्रवादी काँग्रेसच्या वतीने वडनेर दुमाला येथे छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याला दुग्धभिषेक




**नाशिकरोड (प्रतिनिधी):** राजकोट येथील छत्रपती शिवाजी महाराज यांचा ३५ फुटी पूर्णकृती पुतळा कोसळला, राज्य सरकारचा निषेध म्हणून राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाच्या वतीने नाशिकरोड मधील वडनेर, विहितगाव येथील छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्याला शनिवारी सकाळी दुग्धभिषेक करून पुष्पहार अर्पण करण्यात आला. यावेळी शहराध्यक्ष गजानन शेलार, देवळाली विधानसभा अध्यक्ष अशोक पाळदे, लक्ष्मण मंडाले, डॉ. युवराज मुठाळ, समाधान कोठुळे हे उपस्थित होते.

## १९ वर्षांखालील भारतीय क्रिकेट संघात नाशिकच्या साहिल पारखची निवड

### ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या एक दिवसीय मालिकेत खेळणार

**नाशिक (प्रतिनिधी):** नाशिकच्या समस्त क्रीडाप्रेमी व खास करून क्रिकेट रसिकांसाठी जोरदार , अतिशय आनंदाची व अभिमानाची बातमी. नाशिक जिल्हा क्रिकेट असोसिएशनचा युवा खेळाडू, आक्रमक डावखुरा सलामीवीर साहिल पारख याची १९ वर्षांखालील वयोगटातील भारतीय संघात निवड झाली आहे. ऑस्ट्रेलिया विरुद्धच्या तीन एकदिवसीय मालिकेसाठीच्या भारतीय संघात, साहिल पारखची हि निवड बीसीसीआयचे सेक्रेटरी जय शाह यांनी आजच घोषित केली आहे. पुदुचेरी येथे २१ ते २६ सप्टेंबर दरम्यान , १९ वर्षांखालील भारतीय संघाची ऑस्ट्रेलियाविरुद्ध तीन एकदिवसीय सामन्यांची मालिका होत आहे. भारताचा १९ वर्षांखालील क्रिकेट संघ इतर देशांशी आंतरराष्ट्रीय सामने खेळत असतो , तसेच आय सी सी तर्फे नियमितपणे १९ वर्षांखालील क्रिकेट विश्वचषकही आयोजित करण्यात येत असतो. नाशिकचा खेळाडू भारतीय संघात असावा हे स्वप्न अखेर पूर्ण झाले आहे. साहिलच्यारूपाने नाशिकचा खेळाडू भारतीय संघाचे प्रतिनिधीत्व करणार आहे.



युवा साहिल पारखची महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशन-एम सी ए - तर्फे, नव्या २०२४-२५ हंगामासाठी महाराष्ट्र संघाच्या रणजी ट्रॉफी स्पर्धेच्या शिबिरासाठी याआधीच निवड झाली आहेच. साहिल पारख २६ एप्रिल ते २२ मे दरम्यान झालेल्या भारतीय क्रिकेट नियामक मंडळ - बीसीसीआय - तर्फे आयोजित नॅशनल क्रिकेट अकादमी - एन सी ए - च्या राष्ट्रीय पातळीवरील शिबिरात सहभागी झाला होता. त्यापूर्वीच्या हंगामात देखील १६ वर्षांखालील वयोगटात साहिलची निवड झाली होती. माजी कसोटीपटू व्हि. व्हि. एस. लक्ष्मण प्रमुख असलेल्या एन.सी.ए बेंगळुरू तर्फे भारतभरातील उदयोन्मुख , युवा खेळाडूंसाठी हे शिबीर झाले. साहिल पारखचे शिबिर नाडियाद येथे पार पडले. वेळोवेळी झालेल्या राष्ट्रीय व राज्यस्तरीय स्पर्धेत केलेल्या लक्षणीय कामगिरीच्या जोरावरच १९ वर्षांखालील महाराष्ट्राच्या संघापाठोपाठ साहिलची यंदा एन सी ए च्या राष्ट्रीय पातळीवरील खास शिबिरासाठी दुसऱ्यांदा निवड झाली होती. साहिलने मागील २०२३-२४ च्या हंगामात राज्यस्तरीय आमंत्रितांच्या (सिनियर इन्व्हिटेशन लीग) टी-२० क्रिकेट स्पर्धेत वरिष्ठ खुल्या गटात खेळताना ३ सामन्यात १८४ च्या स्ट्राइक रेट नी एकूण १६४ धावा फटकावल्या. याच हंगामात इंदोर येथे झालेल्या बी सी सी आय च्या १९ वर्षांखालील विनू मंकड करंडक स्पर्धेत महाराष्ट्र संघाने बलाढ्य मुंबई संघावर ११५ धावांनी विजय मिळवत विजेतेपद मिळवले. भारतीय संघातील साहिलच्या या अतिशय गौरवपूर्ण व महत्वाच्या निवडीबद्दल नाशिक जिल्हा क्रिकेट संघटना व जिल्हा संघात, तसेच जिल्ह्यातील क्रिकेट रसिकांमध्ये आनंदाचे वातावरण तयार झाले आहे. यावेळी सेक्रेटरी समीर रकटे,माजी रणजी खेळाडू राजेंद्र लेले, सतीश गायकवाड,फ्रुय्याज गंजीफ्रॉकवाला, रतन कुइटे, शर्मिला साळी, भावना गवळी, शांताराम मेणे, खेळाडू उपस्थित होते.

# राममंदिर ते कावनई येथे जगदगुरु नरेंद्राचार्य महाराज पाई दिंडी सोहळा उत्साहात

भगीरथ आतकरी,

**इगतपुरी (प्रतिनिधी):** अज्ञानातून तरुन जायचं असेल तर साधूची संगतीच उपयुक्त ठरु शकते. साधु-संत हे आपल्याला अज्ञानाच्या निद्रेतून जागे करणांया संतांचे आपल्यावर अनंत उपकार आहेत, असं सांगताना तुकाराम महाराज काय सांगू आता संतांचे उपकार, मन निरंतर जागविती असे आपल्याला सांगतात.

अत्यंत प्रेमळ संत आपल्याला क्षणोक्षणी सांभाळत, सावरत असतात. त्यांचे आपल्यावर अनंत उपकार आहेत. त्यांच्याप्रति कृतज्ञ भाव ठेवून राहणे केव्हाही हिताचे ठरते असे मार्गदर्शन जनम प्रवचनकार बिपिन नेवासकर यांनी आपल्या सुमधुर प्रवचनातून केले. इगतपुरी तालुक्यातील येथे जगदगुरु नरेंद्राचार्य महाराज यांचा पाई दिंडी मोठ्या अध्यात्मिक वातावरणात संपन्न झाला. यावेळी जनम प्रवचन कार मोहन महाराज कुलकर्णी यांनी आजची पिढी व्यसनाधीन झाली असून भावी पिढी सुसंस्कृत आणि व्यसनमुक्त करण्यासाठी संतांनी सांगितलेल्या मार्गावर जगा. मुलांना सत्संगात आणा. तुम्ही जगा आणि दुसऱ्याला जगवा. स्वप्नात सुद्धा कोणाचे वाईट चिंतू नका असा संदेश उपस्थित भाविकांना सांग जगदगुरू नेंद्राचार्य महाराज यांच्या कार्याची महती सांगितली. सत्संगानिमित्त सकाळी ८ वाजता गावातुन पालखीची मिरवणूक काढण्यात आली. या मिरवणुकीतील विविध देखाव्यांनी भाविकांचे मन वेधून घेतले. भाविकांनी मंत्रमुग्ध होऊन या



कार्यक्रमाचा आस्वाद घेतला. १५०० भाविकांनी या कार्यक्रमाद्वारे लाभ घेतला. महाप्रसादानंतर कार्यक्रम संपन्न झाला. या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून जिल्हाप्रमुख कोंबडे मामा, जिल्हा प्रसिद्धीप्रमुख संदीप देवरे, जिल्हा कर्नल लक्ष्मीकांत आडोळे, महिला जिल्हाध्यक्ष अर्चना गवळी, इगतपुरी तालुका ॲम्ब्युलन्स निरीक्षक राजेंद्र उदावंत, तालुकाध्यक्ष देवराम राक्षे, महिला अध्यक्ष मनीषा गतीर, युवा प्रमुख तुषार घोरपडे, केशव तोकडे, भगवान घोरपडे, ज्ञानेश्वर पवार, गोकुळ आगीवले, दत्तात्रय आडोळे, नागेश भुसे, संतोष महाराज थोरात, सर्व तालुका कमिटी, सत्संग कमिटी हजर होते.

# स्व. विठ्ठलराव घारे यांच्या सुनबाई अनिता घारे विधानसभा निवडणुकीच्या रिंगणात!

भागीरथ आतकरी,

**इगतपुरी (प्रतिनिधी):** इगतपुरी त्र्यंबकेश्वर मतदार संघात विधानसभेच्या निवडणुका जशा जवळ येऊ लागल्या तशा इच्छुक उमेदवारांची धावपळ सुरू झाल्याचे पाहावयास मिळत आहे. अशातच माजी आमदार स्व.विठ्ठलराव घारे यांच्या सूनबाई तथा आदिवासी सेवक पुरस्कार प्राप्त अनिताताई घारे ह्या देखील निवडणुकीच्या रिंगणात उतरून आपले नशीब अजमवनार आहे. इगतपुरी त्र्यंबकेश्वर विधानसभा मतदार संघ हा आदिवासी राखीव असल्याने यावेळी स्थानिक आणि परके या मुद्यावर गाजणार आहे यात शंकाच नाही.

आपल्या मतदार संघाचा विकास करण्यासाठी स्थानिक इच्छुक असणाऱ्या अनेक उमेदवारांनी आपआपली ओळख करून प्रत्येक गावागावात जाऊन संवाद साधत आहे. स्व.माजी आमदार विठ्ठलराव घारे यांनी १९८० च्या दशकात दोन पंचवार्षिक विधानसभा सदस्य होते, ते काँग्रेस पक्षाचे निष्ठवंत असल्याने त्यांना काँग्रेस पक्षाचे तिकीट मिळत हेते. त्या काळी भाताचा लढा खूप गाजला होता. विठ्ठल बाबा यांनी स्वत:चेच शेत जमीन गहाण ठेवून शेतकऱ्यांना आर्थिक मदत केली होती. साधे राहणी मान उच्च विचार सरणी असा वसा घेतलेल्या आदिवासी कुटुंबातील साधा माणूस म्हणून इगतपुरी तालुक्यातील जनतेने निवडून दिले होते. अनिता घारे ह्या



माझे सासरे स्व. माजी आमदार विठ्ठलराव घारे हे दोन वेळा इगतपुरी तालुक्याचे आमदार होते. माझे पती सुद्धा इगतपुरी पंचायत समितीचे सभापती होते. माझ्या माहेरी माझे आजोबा अकोला संगमनेरचे पहिले आमदार होते. त्यामुळे मला राजकारणाचे बाळकडू लहानपणापासूनच मिळाले आहे. त्यांचा वारसा पुढे समाजसेवा करून चालूच ठेवण्यासाठी जनता जनार्दन यांनी माझ्या पाठीशी उभे राहून मला आशीर्वाद द्यावा हीच विनंती

**अनिताताई घारे**, इच्छुक उमेदवार

मी एक सामान्य मतदार म्हणून स्व. माजी आमदार विठ्ठलराव घारे यांना जवळून अनुभवले आहे. घारे हे इगतपुरी तालुक्यांतील प्रत्येक गावागावात पायी जाऊन संवाद साधत होते. सर्व समाज बांधवांना सोबत घेऊनच त्यांनी काम केले होते. साधी राहणी उच्च विचारसरणी असलेला आमदार म्हणून स्व. विठ्ठलराव घारे यांची ओळख होती. त्यांचेच कार्य पुढे अनिता घारे यांनी चालू ठेवले असुन त्यांना एकदा संधी देऊन विधान सभेवर पाठविले पाहिजे.

**मोहनराव भोईर**, सामाजिक कार्यकर्ते

स्व. माजी आमदार विठ्ठलराव घारे यांच्या सूनबाई तथा स्व. माजी सभापती रामदास घारे यांच्या सौभाग्यवती आहेत. अनिता घारे यांना २०१९ चा महाराष्ट्र शासनाचा आदिवासी क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी केली म्हणून आदिवासी विभागातर्फे आदिवासी सेवक पुरस्कार देऊन गौरवण्यात आले आहे. आनिता घारे ह्या काळूस्ते गावच्या माजी सरपंच असुन आजही ग्राम पंचायत सदस्य आहेत. या मतदार संघातील आदिवासी, कातकरी समाज आजही मूलभूत सुविधांपासुन वंचित आहे. साधे घरकुल त्यांना लवकर मिळत नाही, त्यांच्याकडे साधी शिधापत्रिका सुद्धा नसुन विकासापासुन कोसो दुर आहे. आदिवासी समाजा बरोबरच इतर समाजाच्या अडचणी सोडवण्यासाठी तसेच मतदार संघाचा विकास झाला पाहिजे यासाठी, बेरोजगारी दुर करण्यासाठी, शेतकऱ्यांच्या मालाला हमीभाव मिळवुन देण्यासाठी, धरणग्रस्तांना न्याय मिळवून देण्यासाठी व सासरे माजी आमदार विठ्ठलराव घारे यांच्या सारखा विकास करण्यासाठी मी ही विधानसभेची निवडणूक लढवणार असल्याची माहिती पत्रकार परिषदेत दिली.



महाराष्ट्र न्यूज ही मात्र डिजिटल आवृत्ती प्रसिध्दीसाठी तळ मजला, वावरे प्लाझा, वावरे नगर, कामटवाडे, (पश्चिम) नाशिक-४२२०१०. येथून प्रसिद्ध होत आहे. या आवृत्तीची सर्वस्वी जबाबदारी ही सहसंपादक मंगेश टी ताकाटे यांची असेल. (जाहिरातीसाठी संपर्क : जगदीश वाघ : ९९२९९००८१५, ९८२२२६२८८५)